**स. क्रि. केस नं.१५४/२०१९**

**निशाणी – ६६**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक – ०४ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव –** कुलदिप आनंदराव देशमुख

**वय** – ६३, **व्यवसाय**– सेवानिवृत्त

**राहणार**– येळीव, ता. खटाव, जि. सातारा.

**फिर्यादीतर्फे वकिल श्री.यु.एस.यादव यांचे तर्फे साक्षीदारचा सरतपास शपथेवर –**

१. मी सन २०१७ ते २०१९ पर्यंत सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा पुसेसावळी येथे शाखाप्रमुख म्हणून कार्यरत होतो. मी दिनांक ३०/०६/२०१९ रोजी सेवानिवृत्त झालो. वडी गावचे किरण, दादासो, बाळकृष्ण व कमल यांनी शेतघर बांधण्याकरीता माझ्याकडे कर्जप्रकरण केले होते. त्यांना एकुण ५,००,०००/– रुपये मंजूर झाले होते. ते त्यांना वेगवेगळ्या हप्त्यात दिले गेले. तसा मजकूर निशाणी ६१ मध्ये नमुद आहे. त्यावेळी विकास अधिकारी म्हणून सोपानराव जाधव काम पाहत होते. निशाणी ६१ वर त्याची सही आहे. ती सही मी ओळखतो. निशाणी ६१ वर शेवटचा हप्ता अदा केल्याची नोंद आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

**आरोपींतर्फे वकील श्री.एम.एम.शिंदे यांचे मार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु–**

२. हे खरे की, निशाणी ६१ वरील उतारा माझ्यासमक्ष तयार केला अशी त्यावर नोंद नाही. हे खरे की, त्यामुळे या उताऱ्यातील नोंदीबाबत मला काही सांगता येणार नाही. हे खरे की, त्यातील व्यवहाराबाबत मला काही माहिती नाही.

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ११/०८/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.